सकाळ



टिळकवाडी : ज्येष्ठ सभासद यल्लाप्पा अकनोजी यांचा सत्कार करताना संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले. समवेत प्राचार्य आनंद मेणसे, प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, महेश मजती व इतर.

# ज्येष्ठ सभासद, पाल्यांचा 'रवळनाथ'तर्फे गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

टिळकवाडी, ता. २१ : श्री रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे बेळगाव परिसरातील सेवानिवृत्त, वयाची पंच्याहत्तरी पूर्ण केलेले सभासद व सभासदांच्या यशवंत पाल्यांच्या सत्कार करण्यात आला. संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले अध्यक्षस्थानी होते.

अमृतमहोत्सवी वर्षात पदार्पण केल्याबद्दल यल्लाप्पा अकनोजी, बसवराज सुतार यांचा, तर सेवानिवृत्तीबद्दल अशोक नलवडे, तुकाराम मोदगी, बसाप्पा अदृश्य, लॉर्डा लुईस यांचा सत्कार झाला. यशवंत विद्यार्थी डॉ. रसिका मगदूम, डॉ. करुणा सावगावकर, मनीष सावगावकर, सिद्धी कोळसेकर, आकांक्षा मोदगी, वृषाली पावले, वरदा पाटील, रोहित पोरवाल यांचा शाल, स्मृतिचिन्ह, ग्रंथ व गुलाबपुष्प देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी १३ व्या दक्षिण आशियाई शरीरसौष्ठव अजिंक्यपद स्पर्धेत कांस्यपदक पटकविणाऱ्या व्यंकटेश (चैतन्य) ताशिलदार यांचाही संस्थेतर्फे विशेष सत्कार करण्यात आला.

केवळ पैशांमुळे संस्थेची प्रगती झालेली नाही. तर ज्येष्ठांचा आशीर्वाद आणि ठेवीदार-कर्जदारांचा विश्वास यामुळेच रवळनाथची चौफेर प्रगती झाली आहे, असे बेळगाव शाखा चेअरमन प्राचार्य आनंद मेणसे यांनी नमूद केले. विविध क्षेत्रांतील यशस्वी मान्यवर, ज्येष्ठ सभासद आणि यशवंत पाल्यांचा सत्कार कर्तव्य भावनेतूनच केला जातो. संस्थेच्या स्थापनेपासूनच ही परंपरा जपली आहे, असे संस्थापक अध्यक्ष श्री. चौगुले यांनी स्पष्ट केले. यावेळी ज्येष्ठ संचालक प्राचार्य डॉ. आर. एस. निळपणकर, संचालक महेश मजती, लॉर्डा लुईस यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी बेळगाव शाखा सल्लागार डॉ. अनुपमा धाकोजी, भैरु पाटील, शाखाधिकारी मल्लिकार्जुन पाटील, अकौंटंट सतीश परीट यांच्यासह सभासद, कर्मचारी, हितचिंतक उपस्थित होते. बेळगाव शाखा सल्लागार प्रा. कृपा कुलकर्णी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. संदीप देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. अमित चिंगळी यांनी आभार मानले.